जनसंपर्क कक्ष
16 JAN 2019 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू डॉ. शिंदे यांना 'नारायणी पुरस्कार'

## स्वातंत्र्यसैनिक नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुरस्कार

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना लातूरच्या स्वातंत्र्यसैनिक कै. नारायणराव भगवंतराव कुलकर्णी-गौरकर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा 'नारायणी पुरस्कार-२०१८' सोमवारी प्रदान करण्यात आला.

अशोक नारायण कुलकर्णी-लातूरकर यांच्या हस्ते आणि विनायक कुलकर्णी व गुरुनाथ मिरजगावे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार कुलगुरू डॉ. शिंदे यांना शिवाजी विद्यापीठातील त्यांच्या दालनात प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार गतवर्षी कुलगुरू डॉ. शिंदे यांना जाहीर झाला होता. पूर्वनियोजित बैठकीमुळे कुलगुरू पुरस्कार वितरण समारंभाला उपस्थित राहू शकले नव्हते. त्यामुळे लातूरकर यांनी सोमवारी



**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना पुरस्कार प्रदान करताना अशोक कुलकर्णी- लातूरकर. सोबत विनायक कुलकर्णी, गुरूनाथ मिरजगावे.**

कोल्हापूर भेटी दरम्यान त्यांना पुरस्कार प्रदान केला. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि रोख १००१ रुपये असे पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्काराची रक्कम कुलगुरू डॉ. शिंदे यांनी परत केली आणि त्याचा विनियोग गरजू विद्यार्थ्यांसाठी करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यापूर्वी, हा पुरस्कार राज्याचे माजी मुख्यमंत्री (कै.) विलासराव देशमुख यांच्यासह भारताचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील, लातूरच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. जी.एम. वाघमारे, साहित्यिक व सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी के.डी. कुलकर्णी आदींना देण्यात आला आहे.



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना नारायणी पुरस्कार प्रदान करताना अशोक कुलकर्णी, सोबत डावीकडून विनायक कुलकर्णी, गुरुनाथ मिरजगावे.

# कुलगुरू डॉ. शिंदे यांना नारायणी पुरस्कार प्रदान

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना लातूरच्या स्वातंत्र्यसैनिक कै. नारायणराव भगवंतराव कुलकर्णी-गौरकर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा 'नारायणी पुरस्कार-२०१८' प्रदान करण्यात आला.

अशोक नारायण कुलकर्णी- लातूरकर यांच्या हस्ते आणि विनायक कुलकर्णी व गुरुनाथ मिरजगावे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार कुलगुरू डॉ. शिंदे यांना कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठात प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार गतवर्षी कुलगुरू डॉ. शिंदे यांना जाहीर झाला होता. तथापि, पूर्वनियोजित बैठकीमुळे कुलगुरू पुरस्कार वितरण समारंभाला उपस्थित राहू शकले नव्हते. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि रोख १००१ रुपये असे पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्काराच्या रकमेचा विनियोग गरजू विद्यार्थ्यांसाठी करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यापूर्वी, हा पुरस्कार राज्याचे माजी मुख्यमंत्री (कै.) विलासराव देशमुख यांच्यासह माजी गृहमंत्री शिवराज पाटील, लातूरच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. जी. एम. वाघमारे, साहित्यिक व सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी के. डी. कुलकर्णी आदींना देण्यात आला आहे.

# कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना 'नारायणी पुरस्कार' प्रदान

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना लातूरच्या स्वातंत्र्यसैनिक कै. नारायणराव भगवंतराव कुलकर्णी-गौरकर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा 'नारायणी पुरस्कार-२०१८' सोमवारी प्रदान करण्यात आला. अशोक नारायण कुलकर्णी-लातूरकर यांच्या हस्ते आणि विनायक कुलकर्णी व गुरूनाथ मिरजगावे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार कुलगुरू डॉ. शिंदे यांना त्यांच्या दालनात प्रदान करण्यात आला.



**कोल्हापूर : 'नारायणी पुरस्कार-२०१८' कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना प्रदान करताना अशोक नारायण कुलकर्णी-लातूरकर.**

गतवर्षी कुलगुरू डॉ. शिंदे यांना जाहीर झाला होता. तथापि, पूर्वनियोजित बैठकीमुळे कुलगुरू पुरस्कार वितरण समारंभाला उपस्थित राहू शकले नव्हते. त्यामुळे अशोक लातूरकर यांनी सोमावारी कोल्हापूर भेटी दरम्यान त्यांना पुरस्कार प्रदान केला. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि रोख १ हजार १ रुपये असे पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्काराची रक्कम कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विनम्रपणे परत केली आणि त्याचा विनियोग गरजू विद्यार्थ्यांसाठी करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यापूर्वी, हा पुरस्कार राज्याचे माजी मुख्यमंत्री (कै.) विलासराव देशमुख यांच्यासह देशाचेचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील, लातूरच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. जी. एम. वाघमारे, साहित्यिक व सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी के. डी. कुलकर्णी आदींना देण्यात आला आहे.

# विद्यापीठात तीस प्राध्यापकांना पदोन्नती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात करिअर अॅडव्हान्समेंट स्कीमअंतर्गत (कॅस) मंगळवारी विविध अधिविभागांतील सुमारे तीस प्राध्यापकांना पदोन्नती देण्यात आल्या. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते संबंधितांना पदोन्नतीची पत्रे प्रदान करण्यात आली. ही माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.

डॉ. नांदवडेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यापीठातील अनेक प्राध्यापकांच्या पदोन्नती विविध कारणांनी प्रलंबित होत्या. त्यांची निर्गत करण्यासाठी कुलगुरू डॉ. शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या निर्देशानुसार विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आणि त्याअंतर्गत कॅस स्टेज १ ते २ (लेक्चरर

## कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची माहिती



ते सीनिअर लेक्चरर ), स्टेज २ ते ३ (सीनिअर लेक्चरर ते सिलेक्शन ग्रेड), स्टेज ३ ते ४ (सहायक प्राध्यापक ते सहयोगी प्राध्यापक) आणि स्टेज ४ ते ५ (सहयोगी प्राध्यापक ते प्राध्यापक) अशा पदोन्नती देण्यात आल्या. नियमित पदोन्नतीच्या प्रकरणांबरोबरच १९९५ पासूनच्या प्रलंबित प्रकरणांचाही निपटारा करण्यात आला. सन २००३, २००७, २००८ या काळातल्या प्रलंबित पदोन्नतींचा यात समावेश आहे. त्याही याअंतर्गत करण्यात आल्या. या तीस शिक्षकांना कुलगुरूंच्या हस्ते पदोन्नतीची पत्रे प्रदान करण्यात आली. पदोन्नती पत्र मिळाल्यानंतर प्राध्यापकांनी विद्यापीठात तिळगूळ वाटत पदोन्नती मिळाल्याचे सांगत आनंद व्यक्त केला.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह अधिष्ठाता प्रा. पी. एस. पाटील, प्रा. भारती पाटील, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अॅड. धैर्यशील पाटील, प्रा. प्रकाश कुंभार, प्रा. निखिल गायकवाड यांच्यासह विविध अधिकार मंडळांच्या सदस्यांची उपस्थिती होती.

16 JAN 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दृष्टीबाधितांनी ब्रेल भाषा आत्मसात करावी

## शिवाजी विद्यापीठाच्या संगीत शास्त्र विभागाच्या डॉ. अंजली निगवेकर यांचे प्रतिपादन




**कोल्हापूर : सक्षम संस्थेच्या वतीने आयोजीत कार्यक्रमाचे बक्षीस वितरण करताना डॉ. अंजली निगवेकर, गिरीष करडे, डॉ. चेतन खारकांडे आदी.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

लुई ब्रेल यांनी संशोधन केलेली बिंदू स्पर्श भाषा ही दृष्टीबाधितांसाठी वरदान ठरली आहे. संगणकीय युगात ही भाषा येणे अनिवार्य आहे. दृष्टिबाधितांनी ही भाषा आत्मसात करावी, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या संगीतशास्त्र विभागाच्या डॉ. अंजली निगवेकर यांनी व्यक्त केले.

ब्रेल जयंती निमित्त आयोजीत ब्रेल लेखन वाचन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभामध्ये त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विवेकानंद नेत्र रूग्णालयाचे डॉ. चेतन खारकांडे होते. प्रास्ताविकामध्ये अध्यक्ष गिरिश करडे यांनी लुई ब्रेल यांचा जीनवपट सांगितला. भक्ती करकरे यांनी सुत्रसंचालन, तर विनोद ओसवाल यांनी आभार मानले.

**स्पर्धेचा निकाल :** लहान गट लेखन : वैष्णवी हजाम (प्रथम),सुशांत दाशाळ (द्वितीय), नेताजी काणेकर (तृतीय)

**लहान गट वाचन :** सुशांत दाशाळ (प्रथम). मुकुंद गिणगिणे (द्वितीय), कान्होपात्रा शेंबडे (तृतीय)

**मोठा गट लेखन :** पूनम पूंजारा (प्रथम), अतुल भगत (द्वितीय), सविता चौधरी (तृतिय)

**मोठा गट वाचन :** विशाखा लांडगे (प्रथम), भिकाजी लोकरे (द्वितीय), रोहन लाखे (तृतीय).

सकाळ

# आरक्षण म्हणजे वंचित घटकांना प्रतिनिधित्व

## डॉ. हेमंत तिरपुडे; शिवाजी विद्यापीठात आरक्षणाचे संवैधानिक धोरण विषयावर कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १५ : समाजातील वंचित घटकांना योग्य प्रतिनिधित्व व पर्याप्त सहभाग मिळवून देणे हा आरक्षण धोरणाचा हेतू आहे. दारिद्र्य निर्मूलन हे मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे धोरणे राबवून घडवून आणले पाहिजे, असे प्रतिपादन संविधान धोरणतज्ज्ञ व कर्मचारी भविष्यनिर्वाह निधीचे आयुक्त डॉ. हेमंत तिरपुडे यांनी केले.**

शिवाजी विद्यापीठात डॉ. व विकास केंद्रातर्फे आयोजित बाबासाहेब आंबेडकर संशोधन 'आरक्षणाचे संवैधानिक धोरण' विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या वेळी

'Constitutional Policy of Reservation' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते. वि. स. खांडेकर भाषाभवनमध्ये कार्यशाळा झाली.

डॉ. तिरपुडे म्हणाले, ''आरक्षणाचे धोरण हे आपल्या देशाचे राष्ट्रीय धोरण आहे. त्याबाबत समाजात जागरुकता निर्माण करावी लागेल. आरक्षण हे जातीवर आधारित नाही. आरक्षण



डॉ. हेमंत तिरपुडे.

आणि सवलत हे दोन्ही वेगळे आहेत. आरक्षण हे फक्त दहा वर्षांसाठी नाही आणि आरक्षणाचे प्रमाण ५० % पेक्षा जास्त असू शकते. परंतु याबाबत गैरसमज निर्माण झालेले आहेत, ते दूर करावे लागतील. बदललेल्या आर्थिक धोरणांमुळे एकूण रोजगाराच्या दोन टक्के रोजगारामध्ये आरक्षण उरले आहे व ९८ % रोजगारांमध्ये आरक्षण लागू नाही. त्यामध्ये वंचित घटकांना संधी उपलब्ध होतील, अशा धोरणांची गरज आहे.''

कोणत्याही आधारे अन्याय होऊ नये, जगभरामध्ये सर्वांना संधी या सदरामध्ये आरक्षण दिले जाते. वंचितांच्या विकासासाठी आरक्षणाचे धोरण संविधानकर्त्यांनी दूरदृष्टीने निर्माण केले. ते प्रभावीपणे राबविणे गरजेचे असल्याचे मत डॉ. नांदवडेकर यांनी व्यक्त केले. या प्रसंगी आयुक्त अश्विनकुमार उके, महापारेषणचे अधीक्षक अभियंता रंगनाथ चव्हाण, उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर, गोव्याचे सचिव सगुन वेलीप यांनी मनोगत व्यक्त केले. आशिष हिरकने, डॉ. चेतना सोनकांबळे, इंद्रजित कांबळे, संभाजी कांबळे, मदन कडाळे, सुरेश ढेकणे, तेजश्री सावंत, तेजपाल मोहरेकर, सचिन ढेरे, स्वेता पाटील, राजश्री कोळी व सलमान काकतीकर यांनी संयोजन केले.

16 JAN 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रतिनिधित्व, पर्याप्त सहभाग हा आरक्षणाचा मूळ हेतू

## कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचे आयुक्त डॉ. हेमंत तिरपुडे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

समाजातील वंचित घटकांना योग्य प्रतिनिधित्व व पर्याप्त सहभाग मिळवून देणे हा आरक्षण धोरणाचा हेतू आहे. दारिद्र्य निर्मुलन हे मार्गदर्शक तत्वांच्या आधारे धोरणे राबवून घडवून आणले पाहिजे असे प्रतिपादन संविधान धोरण तज्ज्ञ व कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचे आयुक्त डॉ. हेमंत तिरपुडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने आयोजित केलेल्या आरक्षणाचे संवैधानिक धोरण या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

डॉ. तिरपुडे म्हणाले, कि, आरक्षणाबाबत समाजात जागरूकता निर्माण करावी लागेल. आरक्षण हे जातीवर आधारित नाही, आरक्षण आणि सवलत हे दोन्ही वेगळे आहेत, आरक्षण हे फक्त १० वर्षासाठी नाही आणि आरक्षणाचे प्रमाण ५० टक्के पेक्षा जास्त असू शकते. परंतु याबाबत गैरसमज निर्माण झालेले आहेत ते दूर करावे लागतील. बदललेल्या आर्थिक धोरणांमुळे एकूण रोजगाराच्या दोन टक्के रोजगारामध्ये आरक्षण उरले आहे आणि ९८ टक्के रोजगारामध्ये आरक्षण लागू नाही. त्यामध्ये वंचित घटकांना संधी उपलब्ध



होतील अशा धोरणांची गरज आहे. कोणत्याही आधारे अन्याय होऊ नये, जगभरामध्ये सर्वांना संधी या सदरामध्ये आरक्षण दिले जाते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, वंचितांच्या विकासासाठी आरक्षणाचे धोरण संविधानकर्त्यांनी दूरदृष्टीने निर्माण केले. ते प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे.

कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी अश्विनकुमार उके (आयुक्त, कस्टम व जीएसटी पुणे), रंगनाथ चव्हाण (अधीक्षक अभियंता,महापारेषण, कराड), सगुण वेलीप (सचिव, गोवा सरकार) यांनी मनोगत व्यक्त केले.

स्वागत व प्रास्ताविक केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. सूत्रसंचलन वैभव कांबळे यांनी केले. आभार डॉ. पी. एस. कांबळे यांनी मानले. कबीर नाईकनवरे आणि साथीदारांनी सादर केलेल्या सलाम संविधान गीतांच्या गायनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी आशिष हिरकणे, डॉ. चेतना सोनकांबळे, इंद्रजीत कांबळे, संभाजी कांबळे, मदन कडाळे, सुरेश ढेकणे, तेजश्री सावंत, तेजपाल मोहरेकर, सचिन ढेरे, श्वेता पाटील, राजश्री कोळी, सलमान काकतीकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JAN 2019

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठला रग्बी स्पर्धेत उपविजेतेपद

**कोल्हापूर :** भुवनेश्वर (ओडीशा) येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रग्बी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाला उपविजेतेपद मिळाले. अंतिम सामन्यात पंजाबच्या चंदीगड विद्यापीठाकडून शिवाजी विद्यापीठचा २४-१० ट्राय फरकाने पराभव झाला. या स्पर्धेत विद्यापीठ संघाला अंतिम फेरीत पोहोचविण्यासाठी अक्षय पाटील (रा. तिटवे, ता. राधानगरी) याने मोलाची कामगिरी केली. शिवाजी विद्यापीठला उपविजेतेपद मिळाले असले तरीही स्पर्धेत शानदार कामगिरी करुन दाखवत दबदबा निर्माण केला. पहिल्या सामन्यात या संघाने पंजाबच्या लवली प्रोफेशनल विद्यापीठला, दुसऱ्या सामन्यात राजस्थान विद्यापीठला आणि तिसऱ्या सामन्यात भुवनेश्वरच्या कीट विद्यापीठला हरवले. उपांत्य सामन्यात पटियाला विद्यापीठला पराभूत केले होते.

